उर्वरित उलटतपास वादींतर्फे वकील श्री.एस.आर.ओगले यांचे मार्फत शपथेवर सुरु–

२५. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीसंदर्भात माहिती माझ्या पेक्षा जास्त माझ्या आईला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझी आई घरातील सर्व कामे करते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझी आई सध्या आजारी असते. हे म्हणणे खरे नाही की बाजारात जावयाचे असल्यास माझी आई स्वतः बाजारात जाते व सामान आणते. हे म्हणणे खरे नाही की माझी आई सध्या आजारी असते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आईचे व इतर भावंडांचे कुलअखत्यारपत्र माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे त्यांच्यावतीने मला न्यायालयात जबाब देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.२क सिमा घोणे व माझी आई प्रतिवादी नं.२फ मंगला अणसूरकर न्यायालयात आल्यास त्या खरे सांगतील या भितीने त्यांना बाजूला करुन मी आज स्वतः न्यायालयात साक्ष देण्यासाठी आलो आहे.

२६. हे म्हणणे खरे आहे की मी दोन्ही बाजूंकडून दाखल केलेली कागदपत्रे पाहिलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतींचे सातबारा उतारे, फेरफार उतारे, गटबुक नकाशे मी पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की सुलोचना भाटकर यांना दावा मिळकती त्यांच्या माहेरकडून मिळाल्या असून त्यांना मुलबाळ नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतींच्या सातबारा उताऱ्यावर नावे लावण्यावरुन वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यामध्ये तलाठी, उपविभागीय अधिकारी (महसूल) व जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे जी महसूल प्रकरणे चालू होती त्याबद्दल त्यावेळी माझ्या वडिलांना माहिती होती. दावा मिळकतींच्या मालकीहक्कावरुन वादी व प्रतिवादी क्र. १ हे भांडत होते किंवा कसे याची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी त्या त्यावेळी त्या त्या महसूल न्यायालयामध्ये कोणती बाजू मांडली ते मला सांगता येणार नाही. माझ्या वडिलांनी तलाठी, उपविभागीय अधिकारी (महसूल) व जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे चाललेल्या महसूल प्रकरणांमध्ये स्वतःला पक्षकार करुन घेण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. १ यांनी उपविभागीय अधिकारी (महसूल) व जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे दाखल केलेल्या महसूल प्रकरणांमध्ये मला का पक्षकार केले नाही असे माझ्या वडिलांनी प्रतिवादी क्र. १ ला विचारले

नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी १४५ व १४६ येथील करार मी किंवा माझ्या वडिलांनी आजपर्यंत नोंदणीकृत करण्याचा प्रयत्न केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी किंवा माझ्या वडिलांनी निशाणी १४५ व १४६ येथील करारातील मिळकतींचे योग्यते मूल्यांकन करुन शासन दप्तरी योग्यतो मुद्रांक शुल्क भरण्याचा प्रयत्न केला नाही. मी किंवा माझ्या वडिलांनी जो काही प्रयत्न केला त्याबाबतची कागदपत्रे सदर केसकामी मी दाखल केलेली नाहीत. तशी कागदपत्रे माझ्या ताब्यात आहेत. निशाणी १४५ व १४६ येथील कराराअन्वये माझ्या वडिलांना मिळालेल्या हक्कांची नोंद सातबारासदरी करण्याचा प्रयत्न मी किंवा माझ्या वडिलांनी केला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी अथवा माझ्या वडिलांनी वादी व प्रतिवादी क्र. १ यांना नोटीसा देवून दावा मिळकतींमध्ये मालकीहक्क अथवा अन्य कोणताही हक्क उभारलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दरवर्षी तलाठी कार्यालयाकडून पिक पाहणी होतेवेळी मी किंवा माझ्या वडिलांनी आमच्या तथाकथीत वहिवाटीबाबतची नोंद करुन घेण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की तलाठी कार्यालयात देखील माझी अथवा माझ्या वडिलांच्या वहिवाटीबाबतची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की पिक पाहणी नोंदीविरुध्द मी किंवा माझ्या वडिलांनी कोणतीही दाद मागितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की वादी यांनी सातबारासदरी आपले नाव नोंद व्हावे यासाठी जो अर्ज तलाठी कार्यालयात दिला होता त्यावेळी माझ्या वडिलांनी हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की शासनाकडून पिक नुकसान भरपाई मला कधीही मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीमध्ये भात लागवडीसाठी बियाणे, औषधे, खते खरेदी केल्याबाबतचा व भातविक्री बाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये माझा ताबा असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की सातबारा उताऱ्यामध्ये नोंदी, पिक पाहणी नोंद, अपिलांमध्ये पक्षकार होणे या सर्वांबाबतचे स्पष्टीकरण माझ्या प्रतिदाव्यात, कैफियतीमध्ये व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये मी स्पष्टीकरण दिले आहे. (साक्षीदाराला निशाणी १५० येथील त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की तसे स्पष्टीकरण माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या ताब्यातील कागदपत्रे खोटी असल्याने मी सातबारा उताऱ्यामध्ये नोंदी, पिकपाहणी नोंद, अपिलांमध्ये पक्षकार होणे याबाबी केल्या नाहीत व त्याचे स्पष्टीकरण मी माझ्या सरतपासाच्या

प्रतिज्ञापत्रामध्ये दिले नाही.

२७. सन १९८५ मध्ये दोन्ही करारपत्रे करण्यापुर्वी माझ्या वडिलांनी सातबारा उतारे, फेरफार उतारे, सर्च रिपोर्ट करणे व पेपर नोटीस देणे या गोष्टी केल्या नाहीत . (साक्षीदाराला निशाणी १४५ व १४६ येथील दोन्ही करार दाखविण्यात आले.) हे म्हणणे खरे आहे की दोन्ही करारामध्ये दावा मिळकती या सुलोचना भाटकर यांना माहेरच्या सदस्यांमध्ये वाटप होवून मिळाल्या असे कोठेही लिहिलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की दावा मिळकती या सुलोचना भाटकर यांना त्यांच्या आई वडिलांकडून मिळालेल्या आहेत. सुलोचना भाटकर यांच्या माहेरच्या कुटुंबामध्ये वाटप झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझ्याकडे दोन कराराव्यतिरिक्त काहीही नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या कैफियत, प्रतिदावा व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सुलोचना भाटकर यांच्या माहेरच्या कुटुंबामध्ये झालेल्या वाटपाबाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नसतानाही त्याबाबत कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की निशाणी १४५ येथील करारामध्ये जी मुदत दिली आहे त्या मुदतीत सुलोचना भाटकर यांनी प्रांत कार्यालयाची परवानगी घेतली नाही. सुलोचना भाटकर यांनी प्रांत कार्यालयाची परवानगी घेतली असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी सदर केसकामी दाखल केलेला नाही. तसा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्या ताब्यात नाही. सुलोचना भाटकर यांनी प्रांत कार्यालयाची परवानगी घेतली होती अशा आशयाचे जे मी उत्तर दिले ते बरोबर आहे की चुक आहे हे मी नक्की सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी १४५ येथील करार झाल्यापासून ते सुलोचना भाटकर यांच्या मृत्यूपर्यंत मी किंवा माझ्या वडिलांनी पत्र अथवा नोटीस देवून सुलोचना भाटकर यांना प्रांत कार्यालयाची परवानगी घेवून खरेदीखत करुन देण्यास कळविले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी अथवा माझ्या वडिलांनी सुलोचना भाटकर यांच्या मृत्यूपर्यंत त्यांना कामे करण्यासाठी मदत केली अथवा तसा प्रस्ताव दिला असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की सुलोचना भाटकर यांच्या हयातीत या कागदपत्रांची पुर्तता करुन मागितल्यास त्या नाकारतील या भितीने मी किंवा माझ्या वडिलांनी तसे कोणतेही प्रयत्न केले नाहीत. दोन्ही करारावरील साक्षीदारांपैकी कोणत्या साक्षीदाराची साक्ष आम्हाला

घ्यावयाची आहे हे आता मला नक्की सांगता येणार नाही.

**(वादींचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(के.के.पाटील)
दिनांक– १३/१२/२०२३. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.